# ऋणनिर्देश

प्रस्तुत शोध निबंध सादर करतांना आंतरिक समाधान होत असून माझ्या मार्गदर्शिका डॉ.एम.एस.पद्मिनी प्राध्यापक व विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. सतत प्रोत्साहन दिले यामुळे माझे शोध-निबंधाचे काम पूर्ण होऊ शकले. याबद्दल मी प्रथम माझ्या मार्गदर्शिका डॉ.एम.एस.पद्मिनी यांची ऋणी आहे.

तसेच हे संशोधन कार्य पूर्ण करण्यात महत्त्वाचे योगदान असणाऱ्या, वेळोवेळी अभ्यासास प्रेरणा, स्फूर्ती देणाऱ्या शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अधिव्याख्याता डॉ.एन.आर.सप्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी यापूर्वी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असणाऱ्या आदरणिय डॉ.सी.एम.येवले यांचे देखिल मोलाचे सहकार्य प्राप्त झाले. शिक्षणशास्त्र विभागातील डॉ.पी.एस.पाटणकर, डॉ.जी.एस.पाटील, श्री.के.बी.पाटील, श्रीमती आर.यु.संकपाळ, श्री. निर्मळ यांनी देखिल वेळोवेळी महत्त्वपूर्ण व दिशादर्शक असे मार्गदर्शन केले. याबद्दल मी या सर्वांची व शिक्षणशास्त्र विभागाची अत्यंत ऋणी आहे.

एम.फिल. पदवीसाठी सादर असलेल्या या शोध-निबंधाचे कार्य पूर्ण करत असताना मला आठवण येते ती श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशनचे माजी प्राचार्य गोरे आणि प्राचार्य एस.के.पाटील यांनी केलेले मोलाचे सहकार्य, संस्थेचे सचिव श्री.एस.एस. नवले यांनी देखिल केलेले सहकार्य यामुळे माझ्या संशोधन कार्यात महत्त्वपूर्ण योगदान मिळाले. तसेच माझे कॉलेजचे सहकारी प्राध्यापक, कर्मचारी यांनी देखिल वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला त्याबद्दल मी या सर्वांची आभारी आहे. माझे विद्यार्थी व ग्रंथपाल श्री.नगरकर यांनी संदर्भ पुस्तके उपलब्ध करून दिली याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्यास महत्त्वपूर्ण योगदान देणारे डॉ. कुंभार व शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.बी.एम.हिर्डेकर यांची मी ऋणी आहे. श्रीमती उपलाने, श्रीमती पंडित तसेच डॉ.डी.वाय.पाटील शिक्षणशास्त्र महाविदयालयातील प्राचार्य गुरव, ग्रंथपाल श्रीमती अपर्णा शेगडगे, सहकारी प्राध्यापक व बी.एड्.चे छात्राध्यापक यांनी जे सहकार्य केले याबद्दल मी या सर्वांची शतश: आभारी आहे.

माझे एम.फिल. चे सहकारी व माझे कुटुंबिय – आई, वडील, भाऊ यांच्या मोलाच्या सहकार्याने मी या शोध निबंधाचे काम वेळेत पूर्ण करू शकले. माझ्या संशोधन कार्यात अव्यक्तपणे ज्यांनी सहकार्य केले अशा सर्व ज्ञात–अज्ञात व्यक्तींची मी ऋणी आहे. या सर्वांच्या सहकार्यातूनच हे संशोधन कार्य मी पूर्ण करू शकले याचे मला समाधान वाटते.

एम.फिल. संशोधन कार्याचा अहवाल लिहिल्यानंतर सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे टंकलेखन यासाठी मदत केली एस.एन.नाईक व त्यांच्या सोबत असणारे श्री.आर.के.यादव यांनी सुवाच्च्य, आकर्षक आणि वेळेत टंकलेखन केले यामुळे माझे संशोधन कार्य व्यवस्थितरित्या पूर्ण होऊ शकले. याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :

Jrpatil

कु. ज्योतीताई रामराव पी. पाटील